CMYK

बीड । शुक्रवार
०७.०३.२०२५
वर्षे : ४ अंक : ३२८
किंमत : ३ रु. पाने : ४

दैनिक ● www.marathwadapatra.com
# मराठवाडा पत्र
■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■




dailymarathwadapatra2021@gmail.com RNI:Reg.NO.MAH/MAR/2021/80074 Post:Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 Mob:9822152955 

# अमानुष मारहाण प्रकरणी सतीश भोसले उर्फ खोक्या विरोधात गुन्हा दाखल

**शिरूर (का) । प्रतिनिधी**

अज्ञात व्यक्तीस विवस्त्र करून मारहाण करणाऱ्या सतीश भोसले ऊर्फ खोक्या याचा व्हिडिओ समाज माध्यमावर व्हायरल झाला होता. याप्रकरणी पोलिसांकडून गुन्हा दाखल झाल्यानंतर भोसलेने तीक्ष्ण हत्याराने मारहाण करून जिवे मारण्याची धमकी दिल्याची तक्रार बावी येथील एका व्यक्तीने गुरुवारी पोलिसात दिली आहे.दिल्यानंतर भोसलेवर दुसरा गुन्हा दाखल करण्यात आला.

तालुक्यातील बावी येथील एका व्यक्तीला विवस्त्र करून मारहाण केली जात असल्याची चित्रफीत व्हायरल झाली होता. या व्यक्तीच्या पायावर एका तुटलेल्या बॅटने जोरजोरात अमानुषपणे मारहाण केली जात असल्याचे दिसत आहे. याप्रकरणात बुधवारी सतीश भोसलेसह चार जणांवर पोलिस उपनिरीक्षक धनंजय कुळकर्णी यांच्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला होता.

याप्रकरणी दुसराही गुन्हा दाखल झाला आहे. बावी येथील फिर्यादी दिलीप ढाकणे (वय ५५) हे रानवस्ती येथे आपल्या कुटुंबीयांसह राहतात. ते आपल्या जांभळीच्या शेतामधे गेल्यानंतर झापेवाडी येथील भाऊसाहेब भोसले याने हरिण पकडण्याकरीता जाळे लावल्याचे त्यांना समजले. जाळे काढून घेण्यास सांगताच भोसलेने साथीदारांना बोलावून मारहाण केली.

आरडाओरड ऐकून दिीप ढाकणे यांचा मुलगा महेश त्याठिकाणी आल्यानंतर ते पळाले. फोन करून त्यांनी सतीश भोसले आणि साथीदारांना बोलून घेऊन दोघांना मारहाण



केली. त्यामध्ये दिलीप यांचे दात पडले तर महेशच्या पायाला गंभीर दुखापत झाली आहे. दरम्यान, सतीश भोसले हा माझा कार्यकर्ता असला तरी त्याच्यावर कारवाई करावी, अशी मागणी आमदार सुरेश धस यांनी केली आहे.



# आधी अपहरण, मग मरेपर्यंत मारलं, नंतर ३५ लीटर डिझेलने मृतदेह जाळला

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

अहिल्यानगरमध्ये टोळीच्या वर्चस्ववादामुळे एका मुलाचे अपहरण करून त्याची निर्घृण हत्या करण्यात आली आहे. हत्येनंतर मृतदेह केकताईयी डोंगरावर नेऊन मृतदेह जाळण्यात आला आणि त्याची हाडेही जाळून टाकली गेली. त्याची राख ओढ्यात फेकून देण्यात आली. या प्रकरणामुळे एमआयडीसी परिसरात मोठी दहशत पसरली आहे.

अहिल्यानगर एमआयडीसीमध्ये दोन टोळ्यांमध्ये जीवघेणी स्पर्धा सुरू झाली आहे. टोळ्यांम




ध्ये सदस्यांना गाठून मारण्याचे प्रकार सध्या सुरू आहे. त्यातूनच वैभव उर्फ सोन्या नायकोडी या १९ वर्षीय तरुणाचे २२ फेब्रुवारी रोजी सकाळी नऊ ते दहा जण अपहरण करून त्याला नगरपासून जवळ असलेला गोल्डन सिटी या लेआउटमध्ये निर्जनस्थळी नेऊन त्याला तेआउटच्या चेंबरमध्ये टाकून मारहाण करण्यात आली. त्याच्याबरोबर त्याच्या एका मित्रालाही अपहरण करून आणण्यात आले होते. या दोघांनाही नऊ ते दहा जणांनी एकत्र येऊन जबर मारहाण केली.

**● हाडही जाळून टाकली**

एवढ्यावरच आरोपी थांबले नाही चेतना नगर येथील प्लॉटवर नेऊनही मारहाण केली. त्या मारहाणीमध्ये वैभव नायकोडी याचा मृत्यू झाला. मृत्यू झाल्यानंतर आरोपींनी लाकूड आणि ३५ लिटर डिझेलच्या साह्याने त्याचा मृतदेह जाळून टाकला त्यानंतरही हाड जळत नाही म्हणून त्या हाडांवर डिझेल टाकून हाडही जाळून टाकली आणि त्याची राख ओढ्यात नेऊन सोडून दिली. याप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यामध्ये वैभव नायकवडी यांच्या आईच्या फिर्यादीवरून अपहरण आणि खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणात पोलिसांनी आतापर्यंत नऊ आरोपींना अटक केली आहे.

**● पोलिसांची भूमिका संशयास्पद**

या प्रकरणांमध्ये अपहरणाची घटना घडल्यावर दोन दिवसांनी वैभव नायकोडी याचे नातेवाईक फिर्याद देण्यासाठी गेले असता त्यांची फिर्याद घेण्यास टाळाळ केला असा आरोपही नातेवाईकांनी केला आहे. उशिरा फिर्याद घेतल्यानंतरही स्थानिक पोलिसांनी योग्य तपास केला नसल्याचा आरोप त्याच्या नातेवाईकांनी केला आहे त्यामुळे

▶▶ उर्वरित पान २ वर

# 8 मार्च रोजी दिव्यांगणा साहित्याचे होणार वाटप

**बीड । प्रतिनिधी**

जिल्हयातील सर्व दिव्यांग बंधु-भागिना सन २०२४-२५ मधील जिल्हा परिषदेचे स्व. उत्पन्न ५% दिव्यांग कल्याणार्थ राखीव निधीमधून अस्थिव्यंग प्रवर्गीय दिव्यांगाना मोफत तीन चाकी स्कुटर विध ॲडप्टरचा पुरवठा करण्याची योजना राबविण्यात आलेली आहे. सदर योजनेच्या अनुषंगाने पंचायत समिती कार्यालयामार्फत अर्जाची मागणी करण्यात आलेली होती. सदर बाबतीत खालील अर्ज प्राप्त झालेले आहेत.

एकुण बीड जिल्ह्यात १३२८ अर्ज प्राप्त असुन एकुण ५४ दिव्यांग बांधवाना तीन चाकी स्कुटर विथ ॲडप्टरचा पुरवठा करावयाचा आहे. सदर ५४ उद्दिष्ट दिव्यांग सर्व्हेक्षण २०२५ नुसार त्या त्या तालुक्यातील अस्थिव्यंग प्रवर्गाच्या संख्याच्या प्रमाणात खालील प्रमाणे निश्चित करण्यात आलेले आहे.

बीड ९, परळी ४,धारुर४, वडवणी२,केज६.शिरुर (का)४, आष्टी ६,माजलगांव ४,गेवराई ८,अंबाजोगाई ८, २ पाटोदा असे एकूण ५४ वाटप करण्यात येणार आहेत. सदर बाबीत अर्जाची संख्या मोठ्या प्रमाणात असल्यामुळे निर्धारीत उदिष्ट नुसार पात्र लाभार्थ्यांना लाभ देण्याच्या अनुषंगाने दि.०८.०३.२०२५ रोजी सकाळी ठिक-१०.३० वा. डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, नगर रोड बीड येथे लकी ड्रॉ चे आयोजन करण्यात आलेले आहे. सदर लकी ड्रॉ हा इनकेमेरा व सर्व दिव्यांग बांधवाच्या समक्ष करण्यात येणार असुन सर्व अर्जादार यांनी लकी ड्रॉ साठी उपस्थित राहावे असे आवाहन श्रीमती मेश्राम एस.एन. जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद बीड यांनी केले आहे.

# पाणीपुरवठा योजनेचे काम अपूर्ण, दहा मार्चला जिल्हा कचेरीवर मोर्चा

**किल्ले धारूर । प्रतिनिधी**

**प्रशासन व कंत्राटदार यांच्या मनमानी कारभारामुळे अंजनडोह ग्रामस्थांना घोटभर पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे धरण उशाला आणि कोरडे कशाला अशी परिस्थिती अंजनडोह ग्रामस्थांची झाली आहे**

तालुक्यातील अंजनडोह येथील पाणीपुरवठा योजनेचे काम अपूर्ण असल्यामुळे ग्रामस्थांना पाण्यासाठी भटकण्याची वेळ आली आहे संबंधित अधिकारी पूर्ण करून पाणीपुरवठा सुरळीत करा या मागणीसाठी अंजनडोह ग्रामस्थांनी दहा मार्च रोजी जिल्हा कचेरीवर घागर मोर्चा काढणार असल्याचे निवेदन दिले आहे.

जल जीवन मिशन अंतर्गत धारूर तालुक्यातील अंजनडोह येथे १.४५ कोटी रुपयांचा पाणीपुरवठा योजनेचे काम झाले होते मागील अनेक दिवसांपासून संबंधित पाणीपुरवठा योजनेचे काम अपूर्ण आहे या कामाबाबत वेळोवेळी तक्रारी अर्ज देऊनही कुठलीही कार्यवाही न झाल्यामुळे सदरील योजनेचे काम अद्याप पूर्ण होऊ ▶▶ उर्वरित पान २ वर

# दोन समाजातील जातीय तेढ कमी करण्यासाठी शिक्षक संघाने पुढाकार घ्यावा : राजेंद्र मस्के

**बीड । प्रतिनिधी**

अखिल महाराष्ट्र प्राथमिक शिक्षक संघाचा जिल्हा मेळावा दिनांक ५ मार्च रोजी डॉ बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथे अखिल महाराष्ट्र शिक्षक संघाचे राज्याचे अध्यक्ष श्री देविदास बसवदे सर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे बीड जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के



उपस्थित होते. यावेळी आपल्या भाषणातून सध्या जाती-जातीमध्ये सामाजिक सलोखा राहिला नाही हा सामाजिक दरी कमी करण्याचे काम शिक्षकांनी पुढाकार घेऊन करण्याच्या भावना व्यक्त केल्या. शिक्षकाला समाजामध्ये प्रतिष्ठित मानले जाते व ग्रामीण भागामध्ये शिक्षकांबद्दल नेहमीच आदर व्यक्त केला जातो या अनुषंगानेच ग्रामीण भागामध्ये शिक्षकांचे ऐकणारे अनेक नागरिक आपल्याला दिसून येतात त्यासाठी सध्याचे सामाजिक परिस्थिती लक्षात घेऊन जाती

▶▶ उर्वरित पान २ वर

# भडंगवाडी येथील सरपंच पूत्र किंचक राधाकीसन नवले व त्याचे दोन सहकारी यांच्या कडून तक्रारदारास जिवे मारण्याचा प्रयत्न

**गेवराई । प्रतिनिधी**

सविस्तर असे की मौजे भडंगवाडी येथील ग्रामस्थ बाळू तोडेकर यांनी दिनांक २०/०१/२०२५ रोजी मौजे भडंगवाडी येथील ग्रामपंचायत मध्ये मनरेगा योजने अंतर्गत वयक्तिक सह इतरही कामा मध्ये मोठया प्रमाणात गैर प्रकार झाला आसल्याबाबत पंचायत समिती गेवराई येथे तक्रार केली होती त्या अनुषंगाने दिनांक ०४/०३/२०२५ रोजी सदरील तक्रारीची चौकशी करण्यासाठी पंचायत समिती गेवराई येथील चौकशी अधिकारी मनून श्रीमती व्ही.एम.सासवडे शाखा अभियंता, व श्री. माळतकर अरविंद सहाय्यक कार्यक्रम अधिकारी. हे आले होती त्या दरम्यान भडंगवाडी च्या सरपंच अरूनाबई राधाकीसान नवले यांचा मुलगा किंचक राधाकीसन नवले पुतण्या रामेश्वर हनुमंत नवले व कैलास विठोबा माखले यांनी तक्रारदार बाळू तोडेकर यांच्यावर अचानक हल्ला केला व बाळू तोडेकर यांना गंभीर जखमी केले त्या वेळी चौकशी अधिकारी यांनी मात्र तेथून पळ काढला त्यानंतर बाळू तोडेकर यांनी गेवराई पोलिस टेशन येथे तक्रार दिल्याने सबंधित आरोपी यांच्यावर्ती भारतीय न्याय सहिता (बी एन एस)२०२३ कलम ११८(१), भारतीय न्याय सहिता

▶▶ उर्वरित पान २ वर

# वडवणी शहरातील पतंगे ट्रेडर्सला शॉर्टसर्किटने आग लागून लाखोंचे नुकसान

**फर्निचर, प्लायवूड, कलर अन्य बांधकाम साहित्य जळुन खाक**



**वडवणी । प्रतिनिधी**

वडवणी शहरातील चिंचवण रोडवर असलेल्या पंतगे ट्रेडर्सला काल सकाळी ७:३० च्या सुमारास अचानक भिषण आग लागली दुपारी १२ वाजेपर्यंत आग पूर्णपणे आटोक्यात आलेली नव्हती. सदरील आग विझविण्यासाठी अग्निशामकच्या पाच गाड्याना पाचारण करण्यात आल्या होत्या. तर या आगीत लाखो रुपायाचे नुकसान झाले आहे.

याबाबत अधिक माहिती की, वडवणी शहरातील चिंचवण रोडवरील पतंगे ट्रेडर्स या तीन मजली दुकानाला दि.०६/०३/२०२५ गुरुवारी रोजी सकाळी साडेसात वाजेच्या सुमारास भीषण आग लागली. दुकानामधील फर्निचर, प्लायवूड, कलर आणि अन्य बांधकाम साहित्याचा मोठा साठा आगीत जळून लाखोंचे नुकसान झाल्याची माहिती आहे. शॉर्टसर्किटमुळे आग लागली असल्याचे ग्रामस्थांनी सांगितले सकाळी आग लागल्याची माहिती मिळताच दुकान मालक विशाल पतंगे आणि नागरिकांनी चिंचवण रोडवरील दुकानाकडे धाव घेतली. मात्र, शहरात केवळ अग्निशमन गाडी नुसती नावालाच आहे असून

▶▶ उर्वरित पान २ वर




CMYK



# स्त्री सुरक्षा आणि महिला दिन

८ मार्च हा जागतिक महिला दिन म्हणून जगभर साजरा केला जातो. भारतातही या दिवसाची विशेष क्रेझ असते. आपल्या कर्तृत्वाने नावलौकिक मिळवलेल्या स्त्रियांचा या दिवशी विविध कार्यक्रमांतून, वृत्तवाहिन्यांतून, वृत्तपत्रांतून गौरव केला जातो. महिला दिनाच्या निमित्ताने ऑनलाईन विक्रीच्या संकेतस्थळांवरसुद्धा महिलांसाठी विशेष सवलती दिल्या जातात. खासगी कार्यालयांतून महिला अधिकाऱ्यांचा गौरव केला जातो, हे सर्व पाहिल्यावर एक प्रश्न पडतो कि स्त्री ही केवळ एक दिवस गौरवण्याची बाब आहे का ? या भारतभूमीचा, येथील प्राचीन हिंदू संस्कृतीचा अभ्यास केल्यास येथे स्त्रीला नेहमीच सर्वोच्च स्थान दिले गेल्याचे लक्षात येईल. हिंदू धर्मशास्त्राने स्त्रीला शक्तिरूप मानले आहे. कोणतेही कार्य असो वा संकल्प, त्यासाठी शक्ती अनिवार्य आहे. शक्तीविना कोणताही जीव अथवा वस्तू निर्जीव स्वरूप असते. शक्तीचा सन्मान करणारी या देशात ५१ शक्तिपीठे आहेत , त्यांतील साडेतीन शक्तिपीठे आपल्या महाराष्ट्रात आहेत. सज्जनांच्या रक्षणार्थ आणि दृष्टांच्या संहारार्थ शक्तीने आपले मारक रूप वेळोवेळी प्रकट करून असुरी शक्तीचा विनाश केल्याचे आपण धार्मिक कथांतून, मालिकांतून वाचले आणि पाहिले आहे. ज्या दृष्ट शक्तींपुढे देवताही हतबल झाल्या अशांचा नाश देवींनी आपल्या अगाध सामर्थ्याने केला आहे. रामायण घडले ते माता सीतेच्या हरणामुळे, महाभारत घडले द्रौपदीच्या अपमानामुळे. स्त्रीचा सन्मान करण्याची आणि तिच्या रक्षणासाठी सर्वस्व पणाला लावण्याची शिकवण येथील संस्कृती आपल्याला देते. वीरमाता जीजाउंनी शिवाजी महाराजांना बालपणीच शौर्याचे, अन्यायाच्या प्रतिशोधाचे, जनतेचे सर्वस्वी कल्याणाचे बाळकडू पाजले नसते, तर कदाचित या देशाला हिंदवी स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवराय लाभले नसते. एव्हढा गौरवशाली इतिहास ज्या भारतभूमीला लाभला आहे त्या भारतात आज स्त्रियांच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर होत चालला आहे. गेल्या काही वर्षांमध्ये स्त्री अत्याचाराच्या घटनांमध्ये कमालीची वाढ झाली आहे. बलात्कार, विनयभंग, अपहरण, कौटुंबिक हिंसाचाराच्या घटनांमध्ये आजही दिवसागणिक वाढ होत आहे. २०२० पर्यंत महाराष्ट्रात स्त्री अत्याचाराच्या प्रतिदिन सरासरी ८८ घटना घडत होत्या, २०२३ मध्ये हाच आकडा १२६ पर्यंत पोहोचला. गेल्या वर्षभरात तर यामध्ये आणखी वाढ झाली आहे. मागील ५ वर्षांत राज्यात दोन सरकारे आली; मात्र स्त्री अत्याचाराचा आलेख खाली आणणे कोणालाही जमलेले नाही. विद्येचे माहेरघर समजल्या जाणाऱ्या पुण्यात मागील ४० दिवसांत लैगिक अत्याचाराच्या ५६ घटना घडल्या. स्वारगेट बसस्थानकात शिवशाही बसमध्ये झालेल्या बलात्काराने तर राज्याच्या सुरक्षा व्यवस्थेच्या अब्रूची लक्तरे वेशीला टांगली. मुंबईची स्थितीही त्याहून वेगळी नाही. शाळकरी मुलीच काय वृद्धाही वासनांधांच्या अत्याचारापासून वाचलेल्या नाहीत. महिला अत्याचाराच्या घटनांच्या बाबतीत बदनामीच्या भयापोटी किंवा अन्य दबावामुळे सर्वच गुन्ह्यांची नोंद पोलीस दरबारी होत नाही त्यामुळे सरकार दरबारी असलेल्या आकड्यांपेक्षा प्रत्यक्ष आकडा कित्येक पटीने अधिक असतो.

राज्यातील प्रतिदिन होणाऱ्या स्त्री अत्याचाराच्या वाढत्या घटना मनाला अस्वस्थ करणाऱ्या आहेत. पोलीस असो, शिक्षण असो वा वैद्यकीय क्षेत्र कोणतेच क्षेत्र आज महिलांसाठी सुरक्षित राहिलेले नाही. ज्या क्षेत्रांवर महिला पूर्वी डोळे झाकून विश्वास ठेवत असत त्या क्षेत्रातही वासनांधांचा भरणा झाला आहे. चरितार्थ चालवण्यासाठी नोकरीनिमित्त घराबाहेर पडणारी स्त्री खासगी कंपन्यांतील लैगिक शोषणाला बळी पडू लागली आहे. नात्यातील मंडळींकडून केल्या जाणाऱ्या शोषणाचे प्रमाणही वाढू लागले आहे. स्त्रीच्या निर्बलतेचा फायदा घेऊन संधी साधण्यासाठी टपून बसलेल्या वासनांधांची संख्या समाजात वाढू लागली आहे. स्त्री अत्याचारविरोधी कायदे अधिक कठोर करूनही स्त्री अत्याचारांच्या घटनांमध्ये तिळमात्र घट न होता वाढच होत चालली आहे. पोलीस ठाण्यामध्ये नोंद झालेल्या गुन्ह्यांपैकी किती गुन्हे न्यायालयात तग धरतात आणि किती गुन्हेगारांना शिक्षा मिळते ? गुन्हेगारी कृत्यांना चाप बसण्यासाठी आणि गुन्ह्यांची मीमांसा करून गुन्हेगारांना दंडित करण्यासाठी देशात न्यायपालिका कार्यरत आहे; मात्र न्यायपालिकेचा रटाळ कारभार, यादरम्यान गुन्हेगारांना पुरावे नष्ट करण्यास मिळणारी मोकळीक, पोलिसांवरील राजकीय दबाव, पोलीस व्यवस्थेतील भ्रष्टाचार यांमुळे उशिरा मिळाला तरी तो न्याय असेलच याची शाश्वती नसते. महिला अत्याचारांच्या घटना रोखण्यासाठी राज्यात दामिनी आणि निर्भया पथक कार्यरत आहेत. मात्र स्त्री अत्याचाराचा वाढता आलेख पाहता त्यांना अधिक सक्षम करण्याची आज आवश्यकता आहे. बलात्कारासारख्या घटनांमध्ये गुन्हेगारांना शिक्षा मिळण्याचे प्रमाण आपल्याकडे अगदीच नगण्य आहे, परिणामी गुन्हेगारांमधील भय लुप्त होत चालले असून अशा स्वरूपाचे गुन्हे गेल्या काही वर्षांत कमालीचे वाढले आहेत. रांझेगावच्या पाटलाने एका अबला स्त्रीवर अत्याचार केल्याचे कळताच छत्रपती शिवाजी महाराजांनी त्याचे हात पाय तोडण्याचे आदेश देऊन अशा गुन्ह्यांविषयी रयतेमध्ये कायम स्वरूपी भय निर्माण केलेच शिवाय स्वराज्यातील स्त्रियांनाही सुरक्षित केले. स्त्री अत्याचारांच्या गुन्ह्यांमध्ये तत्परतेने आणि कठोर शासन केले गेले तरच गुन्हेगारांमध्ये भय निर्माण होते, हेच या प्रसंगातून सिद्ध होते. त्यामुळे स्त्री अत्याचाराचा चढता आलेख थांबवायचा असेल तर शिक्षाही स्वराज्याप्रमाणेच असायला हवी.

आजच्या स्त्रीपुढे कोण्या मॉडेलचा किंवा नटीचा आदर्श असून चालणार नाही. आजच्या स्त्रीपुढे आदर्श हवा आपल्या पराक्रमाने शत्रूला नामोहरम करणाऱ्या झाशीच्या राणीचा, अहील्याबाई होळकरांचा, वीरमाता जिजाऊंचा, राणी पद्मिनीचा आणि राणी चेन्नम्माचा. जेव्हा प्रत्येक स्त्री स्वतःचे रक्षण करण्यास सक्षम होईल, तेव्हा कोणाची हिम्मत होणार नाही तिच्याकडे वाकड्या नजरेने पाहण्याची. यासाठी प्रत्येक शाळेमधून मुलींसाठी स्वरक्षण प्रशिक्षणाचे नियमितपणे धडे दिले जावेत. येणाऱ्या प्रतिकूल प्रसंगाला कसे सामोरे जावे आणि त्याचा प्रतिकार कसा करावा याचे अद्यावत ज्ञान प्रत्येक मुलीला शालेय जीवनापासूनच दिले जावे. जेणेकरून आज नाहीतर येणाऱ्या काही वर्षांत याचे सकारात्मक परिणाम आपल्याला नक्कीच दिसतील. राज्य सरकरने यासाठी पुढाकार घेण्याची आवश्यकता असून स्वरक्षणासाठी सिद्ध होणाऱ्या मुली भविष्यात समाजातील वाढत्या स्त्री अत्याचारावर नक्कीच अंकुश आणू शकतात. ज्या दिवशी स्त्री अत्याचाराच्या आलेखला उतरती कला लागेल, ज्या दिनी स्त्रियांविषयी सन्मानाची भावना समस्त समाजात निर्माण होईल तोच खऱ्या अर्थाने महिला दिन असेल.

– जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई

# उष्माघात (Heat Stroke)

उष्मलाटेचा अद्याप जागतिक स्तरावर नेमकी अशी व्याख्या केली नसली तरी, सर्वसाधारणपणे एखादया भागात / क्षेत्रात उच्च तापमानामध्ये आकस्मिकरित्या ४.५ अंश सेल्सीअस पेक्षा वाढ होणे यास उष्मलाट म्हणतात. व ६.४ अंश सेल्सीअस पेक्षा तापमानात जास्त वाढ झाल्यास त्यास तीव्र उष्णतेची लाट म्हणतात. जागतिक स्तरावर युरोप, आशिया, अमेरिका,आफ्रिका या ठिकाणी वेगवेगळे निकष आहेत. कारण त्या त्या भागातील सर्वसाधारण हवामानाची स्थिती ही वेगवेगळी असते. आपल्या देशात हवामान खाते व राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण यांच्या निकषानुसार मैदानी भागात ४० डिग्री अंश सेल्सीअस, डोंगराळ भागात ३० डिग्री अंश सेल्सीअसपेक्षा व समुद्र किनारी भागात ३७ अंश डिग्रीपेक्षा जास्त तापमान जात असल्यास त्यास उष्मलाट प्रवण क्षेत्र मानले जाते. तापमानात झालेली वाढ ही हवामान खात्याच्या २ उपविभागामध्ये सलग दोन दिवस ४.५ डिग्रीपेक्षा जास्त नोंदविल्यास दुसऱ्या दिवशी उष्मलाट म्हणून जाहीर केली जाते.

प्रखर उष्णतेमुळे शरीराचे तापमान 104AmoF (40AmoC) किंवा त्याहून अधिक होते, ज्यामुळे विविध अवयवांवर विपरीत परिणाम होतो. योग्य वेळी उपचार न केल्यास उष्माघात प्राणघातक ठरू शकतो.

● उष्माघाताची कारणे:

उष्माघात मुख्यतः दोन प्रकारांमध्ये वर्गीकृत केला जातो.

● श्रम संबंधित उष्माघात

शारीरिक श्रम करत असताना, विशेषतः उन्हात काम करताना किंवा व्यायाम करताना होतो.



● खेळाडू, मजूर, शेतकरी यांना धोका अधिक असतो.

● अश्रम संबंधित उष्माघात – दीर्घकाळ प्रखर उन्हात किंवा उष्ण वातावरणात राहिल्यास होतो.

● लहान मुले, वयोवृद्ध व्यक्ती, तसेच ज्या लोकांमध्ये शरीराचे तापमान नियंत्रण कमी असते त्यांना याचा जास्त धोका असतो.

● उष्माघाताची लक्षणे पटकन ओळखणे खूप महत्त्वाचे आहे. काही प्रमुख लक्षणे पुढीलप्रमाणे आहेत.

● शरीराचे तापमान 104AmoF (40AmoC) पेक्षा अधिक

● घाम येणे थांबते (कोरडी त्वचा)

● चक्कर येणे आणि थकवा, डोकेदुखी, मळमळ, उलट्या, हृदयाचे ठोके वाढणे (Tachycardia)

● भान हरपणे, गुंगीत जाणे किंवा बेशुद्धावस्था

● हात-पाय मुरगळणे किंवा झटके येणे.

उष्माघाताचा धोका पुढील गटांसाठी अधिक असतो:

● वयोवृद्ध आणि लहान मुले, हृदयविकार, उच्च रक्तदाब असलेले रुग्ण, मधुमेह, लठ्ठपणा असलेले लोक,

● बाहेर उन्हात काम करणारे मजूर आणि शेतकरी,खेळाडू आणि सैन्यातील जवान.

● उपाय आणि उपचार– उष्माघात झाल्यास खालील गोष्टी त्वरीत करा: व्यक्तीला सावलीत किंवा थंड ठिकाणी हलवा. कपडे सैल करा आणि शरीरावर थंड पाणी शिंपडा.

● बर्फाच्या पिशव्यांचा उपयोग करून मान, बगल आणि मांड्यांवर शेक द्या.

● गार पाणी पाजण्याचा प्रयत्न करा, पण बेशुद्ध व्यक्तीला पाणी पाजू नका.

● तातडीने वैद्यकीय मदत घ्या.

रुग्णालयात पुढील उपचार केले जातात:

● Intravenous (IV) fluids देऊन शरीरातील पाणी आणि इलेक्ट्रोलाइट्सची कमतरता भरून काढणे.

● शरीराचे तापमान कमी करण्यासाठी विशेष शीतकरण तंत्र वापरणे (जसे की आईस बाथ किंवा ओले कपडे गुंडाळणे).

● हृदयाचे ठोके आणि श्वासोच्छ्वास यांचे निरीक्षण.

● उष्माघात टाळण्यासाठी पुढील गोष्टींची काळजी घ्या: भरपूर पाणी प्या: दिवसभरात नियमित अंतराने पाणी प्या, जरी तहान लागली नसली तरी.

● हलके आणि सैलसर कपडे परिधान करा: उष्ण हवामानात सुती कपडे घाला.

● थेट उन्हापासून बचाव: शक्यतो दुपारच्या वेळेस (११ ते ४) बाहेर जाणे टाळा.

● शारीरिक श्रम कमी करा: प्रखर उन्हात व्यायाम किंवा काम करणे टाळा.

● योग्य आहार घ्या: फळांचे रस, नारळ पाणी, ताक यांचा समावेश आहारात करा.

उष्माघात ही गंभीर स्थिती असून वेळीच उपचार न केल्यास जीवघेणा ठरू शकतो. त्यामुळे लक्षणे ओळखणे, तातडीने कृती करणे आणि योग्य प्रतिबंध करणे महत्त्वाचे आहे. गरम वातावरणात स्वतःची काळजी घेणे आणि इतरांनाही सावध करणे गरजेचे आहे.

पान ४ वरून पुढे...

## संतश्रेष्ठ भगवानबाबांच्या...

आनंद मिळत नाही. व्यसन जीवनाच्या नाश करते. संताने समाजावर उपकार करण्यासाठी कार्य केले. असे सांगून अंजलीताई महाराजांनी आई विषयी हृदयाला मांजर फोडणारे विवेचन केले. आई गेली तर जगातले सुख संपले. वृद्धाश्रमात आई, बाबांना ठेवू नका, ते आशीर्वाद देतील, आजच्याचकीर्तनाचे सार्थक होईल. असे सांगितले.

यावेळी मृदंगाचार्य सचिन महाराज मुंडे आणि निलेश महाराज खेडकर यांनी मृदंगाची सत्संगसंगत केली. गायनाचार्य अक्षय महाराज गर्जे, देविदास महाराज बर्डे यांनी चाल गायन केले कार्यक्रमास स्वामी शिवरुद्रानंद महाराज, माजी उपसभापती कुमार ढाकणे, ह.भ.प. गीताराम महाराज, अशोक ढाकणे सर, कल्याण उगलमुगले, शिवाजी महाराज ढाकणे, परमेश्वर ढाकणे, अशोक ढाकणे, बबन ढाकणे, भारत ढाकणे, भागवत ढाकणे आदींची उपस्थिती होती.

## लग्न सभारंभात...

थोड्याफार ठिकाणी पायास मिळायचे आता कॉम्प्युटरच्या जमाना असल्यामुळे मोबाईल यांच्यामध्ये ते फोटो अपलोड करण्यासाठी मोठी मदत मिळाली आहे आणि पूर्वी व्हिडिओ शूटिंगलाही मागणी होतंच आणि आता पण आहे त्या फोटोज आणि व्हिडिओ शूटिंग काढलेल्या काही मोजक्याच सीडीज उपलब्ध असायच्या आणि ते त्या फोटोग्राफरला मागून घेण्यासाठी अधिकचे वेळ लागायचा आता पाहिजे त्या फोटोस मिक्सिंग जे लोक असेल ते जे खोड्याचे असेल ते खोडून अगदी एका सेकंदाचे फोटोज आणि व्हिडिओ सध्या निघत असून आता त्याची क्रेझ बनली आहे आता स्वतःच्या खिशात मोबाईल आल्यामुळे जो तो व्यक्ती वधू-वरांच्या जवळ जाऊन आपल्या मोबाईल मध्ये फोटो व्हिडिओ घेऊन सोशल मीडियावर तो शेअर करत आहे.

## सरकारी कामात ...

कर्मचाऱ्यास मारहाण करून सरकारी कामकाजात अडथळा निर्माण केल्याप्रकरणी आरोपीची निर्दोष मुक्तता केलेली आहे आरोपी तर्फे ड.गणेश हनुमंत तावरे यांनी काम पाहिले

सदरच्या केसची घटनेची हकीकत अशी की सौताडा येथे रेस्ट हाऊस समोर दिनांक ११/८/२०१२ रोजी आरोपी व इतर नी संगनमत करून फिर्यादीच्या ताब्यातील एस.टी. बस ला मोटरसायकल आडवी लावून बस थांबवून फिर्यादी चालक व वाहक यांना तुम्ही एस.टी.बस का थांबवली नाही या कारणावरून फिर्यादीस खाली ओढले व शिवीगाळ

पान ४ वरून पुढे...

करून लाथा बुक्याने मारहाण केली साक्षीदार वाहक हा सोडण्यास आला असता त्यास पण मारहाण करून त्याचा शर्ट फाडला त्यामुळे त्याचे खिशातील पैसे पडून तसेच तिकीट मशीन पडून मशीनचे नुकसान केले म्हणून सरकारी कामात स्थळा निर्माण करून जीव मारण्याच्या धमक्या दिल्या प्रकरणी आरोपी विरुद्ध पाटोदा पोलिस स्टेशन बीड येथे गु.र.नं.१२४/२०१२ कलम ३५३,३२३,५०४,५०६,४२७,३४ भा.द.वि नुसार फिर्याद दिली होती फिर्यादी कर्तव्यावर असताना आरोपी नागेश मोरे व इतर याने बसचालक यांना मारहाण करून जिवे मारण्याच्या धमक्या देवून शासकीय कामात अडथळा केल्याबाबत गुन्हा दाखल झाला होता. त्याअनुषंगाने तपासी अमलदार यांनी सदर गुन्ह्याच्या अनुषंगाने मा. न्यायालया मध्ये फिर्यादी ,साक्षीदारांचे जबाब नोंदवून दोषारोप पत्र दाखल करण्यात आले, आरोपीच्या विरोधात सत्र केस क्रमांक ५६/२०२१ नुसार शासन वि नागेश प्रकरण चालवण्यात आले.सरकारी पक्षाच्या वतीने साक्षीदार यांचे जबाब नोंदवण्यात आले, आरोपीच्या वतीने घेण्यात आलेला बचाव ग्राह्यधरून व साक्षीदारांच्या जबाबा मध्ये आलेली विसंगती पाहून मा. जिल्हा व सत्र न्यायाधीश साहेब बीड यांनी आरोपींची निर्दोष मुक्तता केली. आरोपीच्या वतीने ड.गणेश हनुमंत तावरे यांनी भक्कम बाजू मांडली.

## स्थानिक स्वराज्य...

नावांची छाननी करून येत्या वीस दिवसांत पदे भरून घेऊ म्हणजे पक्षसंघटना हि वाढेल व येणाऱ्या निवडणूकांमध्ये आपल्याला जास्तीत जास्त यश मिळेल..

आढावा बैठकीच्या निमित्ताने शिवसेना जिल्हा संपर्कप्रमुख परशुरामजी जाधव व शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर यांनी निष्ठावंत शिवसैनिकांना शिवबंधन बांधले. यावेळी सोबत महिला जिल्हा संघटीका प्रमिलाताई माळी, शिवसेनेचे जिल्हा संघटक रतन तात्या गुजर, जिल्हा सचिव युवराज मामा शिंदे, वडवणी तालुका प्रमुख विनायक बप्पा मुळे, धारूर तालुका प्रमुख बाबासाहेब सराफ, माजलगाव शहर प्रमुख दत्ताजी रांजवण, माजलगाव महिला तालुका प्रमुख शेंडगे ताई,युवासेनेचे उपजिल्हा युवाधिकारी वचिष्टजी शेंडगे, युवासेनेचे तालुका युवा अधिकारी नवनाथजी मोरे, धारूर माजी तालुका प्रमुख विनायकजी ढगे, बाबासाहेबजी राऊत, जिल्हा संघटक ज्ञानेश्वर महाराज टाकणकर,दासु पाटील बादाडे, मुन्ना शेठ पवार,ज्येष्ठ शिवसैनिक बंडू मामा जाधव, युवा नेते एकनाथजी पवार सह शिवसेनेचे सर्व आजी माजी पदाधिकारी ज्येष्ठ शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पान १ वरून पुढे...

## आधी अपहरण...

पोलिसांची भूमिका संशयास्पद आहे.मुळात म्हणजे या प्रकरणातील सर्व आरोपी सराईत गुन्हेगार आहेत त्यामध्ये सर्वच आरोपींवर अल्पवयीन असताना गुन्हे दाखल आहेत. नगरमध्ये प्रथमच टोळी युद्धातून ही पहिली हत्या आहे. याकडे पोलीस प्रशासनाने गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे. या प्रकरणांमध्ये तीन पोलिसांची चौकशी होणं महत्त्वाचं आहे, पोलिसांची पण चौकशी करा, नातेवाईकांची मागणी पीडित कुटुंब फिर्याद देण्यासाठी गेले असता त्यांना योग्य वागणूक दिली नाही.. पोलिसांनी आरोपींना ताब्यात घेतलं मात्र त्याची सखोल चौकशी न करता वैभव पळून गेल्याच्या माहितीवर स्थानिक पोलिसांनी विश्वास ठेवून दोन दिवस तपास केला नाही तपासाची चौकशी करण्यासाठी गेलेल्या कुटुंबाला तुमचा मुलगा आरोपी आहे हे माहीत असतं तर आम्ही तुमची फिर्याद घेतली नसती असं सांगितलं गेलं. पोलीस अधीक्षक यांच्याकडे जो अहवाल जातो त्या अहवालानुसार त्यांनी यामध्ये काहीतरी घटना घडल्याचे लक्षात आल्यावर त्यांनी सखोल चौकशीचे आदेश स्थानिक गुन्हे शाखेला दिले. त्यामुळे तोफखाना पोलीस

पान १ वरून पुढे...

स्टेशनचे पोलीस निरीक्षक आनंद कोकरे यांची चौकशी व्हावी, अशी मागणी नातेवाईकांनी केली आहे.

## पाणीपुरवठा योजनेचे...

शकले नाही. पाणीपुरवठा योजनेचे बहुतांश काम पूर्ण झाले आहेत पाणी उपसा करणाऱ्या ठिकाणी विद्युत पंप बसवून उर्वरित कामे पूर्ण करून नागरिकांना पाणीपुरवठा सुरळीत झाला असतात पण प्रशासनाच्या व कंत्राटदाराच्या मनमानी कारभारामुळे गरम असताना घोटभर पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे. धारूर तालुक्यातील रेपेवाडी येथील साठवण तलावावरून अंजनडोह साठी पाणीपुरवठा योजना मंजूर करण्यात आलेली आहे कामाबाबत जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व जल जीवन मिशनचे अभियंता यांना अनेकवेळा निवेदन ही देण्यात आली होती या निवेदनाची दखल न घेतल्यामुळे अंजनडोह ग्रामस्थांनी थेट जिल्हाधिकारी बीड यांना कामाबाद निवेदन दिले आहे दहा मार्च च्या आत काम सुरू न केल्यास ग्रामस्थांनी दहा मार्च रोजी जिल्हा कचेरीवर महिलांचा घागर मोर्चा काढणार असल्याचे निवेदनात म्हटले आहे.

पान १ वरून पुढे...

## दोन समाजातील...

जातीमध्ये वाढलेली दरी कमी करण्यासाठी पुढाकार घ्यावा. आज अखिल महाराष्ट्र प्राथमिक शिक्षक संघाचे वतीने समाजामधील विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय काम करणाऱ्या व्यक्तींचा गुणगौरव सोहळा व सन्मान सोहळा करण्यात आला. या सर्व व्यक्ती समाजामध्ये वंचित व्यक्तीसाठी काम करताना दिसत आहेत .अशा देखील एक सामाजिक बांधिलकी जपण्याचे काम शिक्षकांनी केले आहे. अशा भावना राजेंद्र मस्के यांनी व्यक्त केल्या आहेत. यावेळी बीड जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अशोकरावजी थोरात , उपजिल्हाधिकारी शैलेशजी सूर्यवंशी,अशोक हिंगे, परमेश्वर सातपुते, कल्याण लवांडे, हरिदास घोगरे, सुहास पाटील, गोरख अण्णा सिंघन, गणेश उगले, वैभव स्वामी, रमेश चव्हाण, डोके सर,सुनील कुर्लेकर,कैलास सपकाळ, सुरेश करांडे, मुबारक शेख, अशोक शिंदे, खेडकर सर,लहू पुरी,प्रतिभा शिनगारे,कल्पना रसाळ, राजश्री नलावडे, दुर्गा भारती, मधुमती दूगम,शरद पवळ, गणेश दळवी,शरद जोगदंड, श्रीकांत लहाने, विलास पवार,बाळासाहेब चिकने, तुकाराम पवार, संतोष शिंदे,

पान १ वरून पुढे...

महादेव राऊत, दादा येवले, सचिव कचरे सर इत्यादी उपस्थित होते.

तसेच याप्रसंगी समाजात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या समाजसेवकांचा व विशेष प्राविण्य संपादन करणाऱ्या गुणवंताचा गुणगौरव करून सन्मान करण्यात आला. यामध्ये गौतमजी खटोड, ज्ञानेश्वर काशीद, निलेश मोहिते, वैष्णवी मोहिते, दत्ता बारगजे, मनीषा पवार, जोगदंड ऋषिकेश, सर्वेक्षा रमेश पिसाळ, अजिंक्य संतोष डोंगर, प्राची सूर्यकांत शिंदे इत्यादी गुणवंताचा गुणगौरव करून सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे भारदार सूत्रसंचालन महादेव इनकर यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रतिभा शिनगारे यांनी केले.

## भडंगवाडी येथील...

(बी एन एस)२०२३ कलम ११५ (२) भारतीय न्याय सहिता (बी एन एस)२०२३ कलम ३५२, भारतीय न्याय सहिता (बी एन एस)२०२३ कलम ३५१ (२), भारतीय न्याय सहिता (बी एन एस)२०२३ कलम ३५१ (३), भारतीय न्याय सहिता (बी एन एस)२०२३ कलम ३ (५) गुण्याची नोंद करण्यात आली.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# अंजनवती पोष्टमास्तरने भाऊसाहेब शेटेने केला 50 लाखांचा घोटाळा

## बनावट पासबुक द्वारे अपहार चौसाळा उपडाकघरात पैसे जमा केलेच नाहीत ; अंजनवती ग्रामस्थ संतप्त : डॉ.गणेश ढवळे

**अंजनवती । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील अंजनवती गावातील पोष्ट मास्तर भाऊसाहेब शिवलिंग शेटे यांनी बनावट पासबुक तयार करून चौसाळा उप डाकघरातील कार्यालयात पैसे जमा न करता जवळपास ५० लाख रुपयांचा घोटाळा केल्याचा आरोप अंजनवती आणि घारगाव येथील ग्रामस्थांनी केला असुन यामध्ये रॅकेट कार्यरत असुन चौसाळा डाकघरातील अधिकारी कर्मचाऱ्यांसह सर्वांचीच सखोल



चौकशी करून गोरगरिबांच्या खात्यावरील पैसे परत करावेत अशी मागणी सरपंच कैलास येडे,रेवण येडे, वैभव येडे, सुधीर सोनवणे, महादेव माळी,बाळु शिंदे,मारोती वारकरी, बन्सी शिंदे आदींनी केली आहे.

●मेंढ्या राखुन जमा केलेले दीड लाख रुपये गायब : अनुसया कोंडीबा कर्डीले

मालक वारल्यानंतर , मेंढ्या सांभाळणं होईना मग त्या विकुन दीड लाख रुपये पोस्टात टाकले. बटईने दिलेल्या जमिनीतुन मिळणाऱ्या पैशातून पोटापाण्याचं भागतं. काल गावात कालवा झाला तेव्हा कळलं पोष्ट मास्तरनं घोटाळा केलाय.आता आम्ही काय करावं असा प्रश्न ७५ वर्षीय अनुसया कोंडिबा कर्डुले हताश होऊन विचारताहेत.अशाच प्रकारे फसवणूक झाल्याचे पपिता प्रभाकर थोरात, मुक्ताबाई श्याम राव सोनावणे यांनी सांगितले.

● चौसाळा डाकघरातील अधिकारी व कर्मचारी यांची सखोल चौकशी करून खातेदारानचे पैसे परत करा : कैलास येडे सरपंच अंजनवती

केंद्र शासनाची योजना असल्याने याची विश्वासाहर्ता होती म्हणून गोर गरीब शेतमजुर यांनी पोष्टात पैसे जमा केले.२ वर्षांपूर्वी भाऊसाहेब शेटे पोष्ट मास्तर म्हणुन आल्यावर गोंधळ सुरू झाला. एका माणसाचे काम नसुन चौसाळा डाकघरातील अधिकारी व कर्मचारी यांचा सुद्धा यामध्ये सहभाग असल्याचा संशय असुन सखोल चौकशी करून कारवाई करावी आणि खातेदारांचे पैसे परत करावेत अशी मागणी सरपंच कैलास येडे यांनी केली आहे.

● खातेदारांनी पुरावे द्यावे ;चौकशी करून कारवाई करू : जाकोरे निरीक्षक डाकघर चौसाळा

चौसाळा डाकघराचे निरीक्षक जाकोरे यांनी अंजनवती गावात ग्रामस्थांशी चर्चा करत. खातेदारांनी त्यांच्याकडे असलेल्या खात्याचे पुरावे द्या पुढील कारवाई करण्यात येईल तसेच पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात येणार आहे.असे जाकोरे यांनी सांगितले.

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समितीच्या अध्यक्ष अंकुशराव जाधव ,कार्याध्यक्ष पदी केतन प्रधान

**माजलगाव । प्रतिनिधी**

विश्व भुषण डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती १४एप्रिल रोजी उत्साहात साजरी करण्यासाठी शहरातील भीमनगर येथील उत्सव समितीच्या अध्यक्षपदी आंबेडकर चळवळीतील जेष्ठ नेते अंकुश अण्णा जाधव तर कार्याध्यक्ष पदी केतन प्रधान, सचिन वाघमारे यांची सर्वांनुमते निवड करण्यात आली. आंबेडकर चळवळीतील जेष्ठ नेते राजेंद्र टाकणखार यांच्या अध्यक्षतेखाली ५मार्च रोजी



डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक स्थळी झालेल्या बैठकीत निवडण्यात आलेली उर्वरित उत्सव समितीच्या सचिव पदी किशोर सातपुते, उपाध्यक्षपदी प्रदिप साळवे,सचिन टाकणखार तर कोषाध्यक्षपदी जेष्ठ नेते नवनाथ अण्णा धाईजे यांची निवड करण्यात आली आहे. या समितीला सल्ला देण्यासाठी सल्लागार मंडळाची स्थापना करण्यात आली असुन यात नपचे माजी उपाध्यक्ष कचरू खळगे सह राजेंद्र टाकणखार, टि.आर. जावळे,प्रदिप पट्टेकर, सदानंद भैय्या प्रधान, अनंत वाघमारे, सुधाकरराव निसर्गंध, प्रकाश शिंदे, गणेश जावळे यांची निवड करण्यात आली आहे. बैठकीस उपस्थितीतांचे आभार प्रदिप साळवे यांनी मानले तर निलेश कांबळे, मयुर प्रधान, राजरतन खळगे, शिशिर प्रधान, विशाल सोनपसारे,रृषिकेश सोनवणे,राहुल मस्के,सतीष स्वामी, विश्वजीत साळवे, प्रविण ओव्हाळ, प्रविण निसर्गंध, सुजल खळगे,चेतन जावळे, रविराज भालेराव,अभिजीत घाडगे,किरण जावळे,मुसा धापसे,सौरभ सरपते आदी तरुणांची उपस्थिति होती.



*बीड पंचायत समिती अंतर्गत रोजगार हमी योजनेतील वैयक्तिक लाभ जसे की विहिरी, गायगोठे, शेवगा, घरकुल व सार्वजनिक योजना ज्यामध्ये पांदण रस्ते, खडीकरण, विविध बांधकामे यांच्या मागण्या सुरू राहणे आवश्यक आहे.. त्यामुळे गुरुवारी पंचायत समिती गटविकास अधिकारी (bdo) यांना गावोगावचे योजना सुरू असलेले विहीर, शेवगा, गायगोठा लाभार्थी, सरपंच, उपसरपंच हे ठीक १२ वाजता भेटणार अहोत. कृपया आपण किंवा आपले प्रतिनिधी पाठवावे*



*बीड: अखिल भारतीय मराठा महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष मा. राजेंद्र कोंढरे साहेब यांनी वरवटी/ आहेर धानोरा ग्रुप ग्रामपंचायतचे सरपंच मा.बालासाहेब आबा इंगोले यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या यावेळी मराठवाडा सरचिटणीस मा.विनोद आप्पा इंगोले, बीड जिल्हा अध्यक्ष मा.बापूसाहेब सोळूखे,परमेश्वरा कवचट, उपसरपंच रोहिटे सर आदी छाया चित्रात दिसत आहेत.*

# आज शिरसमार्ग येथे गुरू रंगनाथ देव महाराज जोशी यांचा पुण्यतिथी उत्सव




**बीड । प्रतिनिधी**

प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी ह भ प गुरुवर्य परमपूज्य रंगनाथ देव महाराज जोशी शिरसकर यांची ३१ वी पुण्यतिथी मौजे शिरस मार्ग या गावी संपन्न होत आहे त्यानिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले आहे आज दु,१ वाजता महा अभिषेक ब्राह्मण भोजन कार्यक्रम होणार असून ह भ प बबनदेव महाराज जोशी यांनी महा कुंभ प्रयागराज व जगन्नाथ पुरी तीर्थयात्रा सांगता समारोप जल पूजन कलश पूजन कालाष्टक ब्राह्मण भोजन भोजन होणार असून आज सायंकाळी ठीक नऊ ते ११ ह भ प महंत बालाजी महाराज शेंडगे श्रीराम संस्थान तिंतरवणी यांचे सुश्राव्य कीर्तन होणार आहे व दिनांक ८ मार्च रोजी सकाळी नऊ वाजता ह भ प धुराजी महाराज कोळेकर यांचे प्रवचन व नंतर महाप्रसाद तरी सर्व भाविकांनी या कार्यक्रमाचा अवश्य लाभ घ्यावा असे आवाहन शिरसमार्ग ग्रामस्थ व कार्यक्रमाचे संयोजक व विजय बबन देव जोशी श्रीकृष्ण बबन देव जोशी यांनी केलेआहे

# खरात आडगाव येथे स्वामी विवेकानंद स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राचे भूमिपूजन



**माजलगाव । प्रतिनिधी**

माजलगाव तालुक्यातील खरात आडगाव येथे यशवंती आधार सामाजिक संस्था पुणे संचलित स्वामी विवेकानंद स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राचा भूमिपूजन सोहळा आज संपन्न झाला या भूमिपूजन सोहळ्याचे कार्यक्रमाचे अध्यक्ष महात्मा फुले समता परिषदेचे सरचिटणीस तथा सिनेट सदस्य ॲड. सुभाष राऊत तर कार्यक्रमाचे भूमिपुजन रकमाजी कांबळे यांच्या हस्ते संपन्न झाले प्रमुख उपस्थिती म्हणून बीड जिल्हा परिषदेचे माजी सभापती कल्याण अबुज, सरपंच राज पाटील, पत्रकार दत्तात्रय प्रभाळे सेवानिवृत्त मुख्याध्यापक जे.बी. पांचाळ, संतोष रासवे, ज्ञानेश्वर कोरडे, जगन्नाथ खेत्रे, संयोजक राजेश दिवटे आधी उपस्थित होते यावेळी मुला मुलींनी शिक्षणा बरोबरच विविध स्पर्धा परीक्षा देण्याची आवश्यकता असल्याचे मत एडवोकेट सुभाष राऊत यांनी म्हटले कारण स्पर्धेच्या युगात टिकण्यासाठी स्पर्धा परीक्षा अत्यंत महत्त्वाचे आहेत त्यादृष्टीने विद्यार्थ्यांनी अभ्यास केला पाहिजे त्यासाठी यशवंती आधार सामाजिक संस्था पुणे संचलित स्वामी विवेकानंद स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राचा लाभ होईल तो जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी घ्यायला हवा आणि आपले भविष्य उज्वल करायला हवे अशी शेवटी सुभाष राऊत म्हणाले यावेळी गावकऱ्यासह पंचक्रोशीतील नागरिक विद्यार्थी उपस्थित होते



*डॉ.भीमराव पिंगळे विद्यालय, बीड या ठिकाणी श्रीम.छाया मोहनराव गडगे यांनी बालकांच्या कल्याणासाठी, हितासाठी त्यांच्या जीवनात यशस्वी होण्यासाठी मार्गदर्शन केले.बालकांच्या जीवनात येणाऱ्या अडचणी, समस्या, शोषण, अन्याय, अत्याचार, हिंसाचार, लैंगिक शोषण त्याचबरोबर बालविवाह आणि त्याचे दुष्परिणाम या विषयी सविस्तर मार्गदर्शन केले. शाळेचे मुख्याध्यापक, श्री.डोंगरदिवे रोहिदास यांनी अध्यक्षीय समारोप करताना सर्वांनी सावध राहिले तरच भविष्य उज्वल होईल असे मत व्यक्त केले.*

# श्रीकृष्ण मंदिर परिसरात हाय मस्ट दिवे बसवून हजरत शाह शमशोद्दीन दर्गा कब्रिस्तान ची सफाई करण्यात यावी

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरातील हत्ती खाना येथील श्रीकृष्ण मंदिर परिसरात पाच हाय मस्ट दिवे बसवून येथील हजरत शाह शमशोद्दीन दर्गा कब्रिस्तान ची सफाई करण्यात यावी अशी मागणी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने बीड नगर परिषदेत करण्यात आली आहे.

असे की,बीड शहरातील हत्ती खाना येथे श्रीकृष्ण मंदिर असून या ठिकाणी श्री चक्रधर स्वामी महाराजांनी चार महिने वास्तव्य केला असून येथे महानुभावी पंथाचे आश्रम सुद्धा आहे.श्रीकृष्ण मंदिर येथे बीड



जिल्ह्यातूनच नव्हे तर राज्यभरातून मोठ्या संख्येने भाविक दर्शनासाठी येतात या ठिकाणी हाय मस्ट दिवे बसवण्याची गरज असून आपण आपल्या कार्यालय मार्फत श्रीकृष्ण मंदिर परिसरात हाय मस्ट दिवे बसविण्यात यावे व त्याचप्रमाणे हत्ती खाना येथील हजरत शाह शम शोद्दीन दर्गा कब्रिस्तान सुद्धा असून सध्या मुस्लिम बांधवांचा पवित्र रमजानचा महिना सुरू असून रम जान निमित्त कब्रिस्तान येथे दूरुद – फातीहा पठण करण्यासाठी भाविक मोठ्या संख्येने येत असतात तरी या ठिकाणी साफसफाई करण्याची गरज आहे.

तरी बीड शहरातील हत्ती खाना येथील श्रीकृष्ण मंदिर, निळकंठेश्वर मंदिर,खासबाग देवी मंदिर परिसरात हाय मस्ट दिवे बसवून येथील हजरत शाह शमशोद्दीन दर्गा कब्रिस्तान ची सफाई करण्यात यावी अशी मागणी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने वर्षाताई जगदाळे (महिला राज्य उपाध्यक्ष) सदाशिव बिडवे (जिल्हा उपाध्यक्ष) यांच्या प्रमुख उपस्थितीत अरमजान पठाण (बीड शहराध्यक्ष) यांचे नेतृत्वाखाली बीड नगरपरिषद कार्यालयाचे उपमुख्य अधिकारी सम्राट कदम यांना दिलेल्या निवेदनातून करण्यात आली आहे. यावेळी मोहज्जीब इनामदार,दत्तात्रेय डावकर सही तर कार्यकर्ते उपस्थित होते.

## जाहीर प्रगटन

**मा. विशाखा बी. पाटील ६वे सह. दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांचे न्यायालयात**

**दिवाणी किरकोळ अर्ज नंबर ३७०/२०२५**

**तारामती राजाराम निर्मळ विरूध्द सुमनबाई राजाराम निर्मळ**

अर्जदार – १. तारामती भ्र. राजाराम निर्मळ, वय: ७२ वर्षे, धंदा – घरकाम, रा. बजरंग नगर कॅनॉल रोड बीड. ता. जि. बीड., २.बंडू पि. राजाराम निर्मळ, वय: ४५ वर्षे, धंदा –शेती, रा. बजरंग नगर कॅनॉल रोड बीड. ता. जि. बीड, ३.सतिष पि. राजाराम निर्मळ, वय: ४२ वर्षे, धंदा –शेती, रा. बजरंग नगर कॅनॉल रोड बीड. ता. जि. बीड, ४. दिनेश पि. राजाराम निर्मळ, वय: ४० वर्षे, धंदा –शेती, रा. बजरंग नगर कॅनॉल रोड बीड. ता. जि. बीड

विरुध्द

गैरअर्जदार – १.सुमनबाई भ्र. राजाराम निर्मळ, वय: ६५ वर्षे, धंदा– घरकाम, रा. वसाहती कॅम्प समोर, गोवर्धन रोड सिरसाळा, ता. परळी जि. बीड, २. रेखा पि. राजाराम निर्मळ, वय ३५ वर्षे, धंदा– घरकाम, रा. वसाहती कॅम्प समोर, गोवर्धन रोड सिरसाळा, ता. परळी जि. बीड.

**मागणी : वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत **राजाराम सखाराम निर्मळ,** यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे.

ज्याअर्थी **राजाराम सखाराम निर्मळ, मृत्यु दि. २९/०८/२०२१, रोजी रा. बजरंग नगर कॅनॉल रोड, बीड. ता. जि. बीड**. येथे मयत झालेले असून अर्जदार क. १ ही अर्जदार क्र. २ ते ४ यांची आई असून मयत राजाराम सखाराम निर्मळ, अर्जदार क्र. १ चा पती असून २ ते ४ चे वडील होते. गैरअर्जदार क. १ ही मयताची दुसरी पत्नी असुन गैहअर्जदार क्र. २ हि तिची मुलगी आहे. वरील अर्जदार यांना शासकीय व खाजगी कामासाठी वारस प्रमाणपत्र याची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नाही असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत, त्यांनी हया कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि हया लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार हयांचे हक्काबदद्ल लागलीच पुरावा घेऊन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास, त्यांना सदरहू मयत राजाराम सखाराम निर्मळ, रा. बजरंग नगर कॅनॉल रोड बीड. ता. जि. बीड. यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी. आज दिनांक ०१ माहे ०३ सन २०२५ रोजी माझ्या सहिने व न्यायालयाचे शिक्याने दिले. सदर प्रकरणाची **पुढील तारीख दि. १०/०४/२०२५ आहे.**

**आदेशावरून.**

(स्वाक्षरीत) क.लिपीक | शिक्का | (स्वाक्षरीत) अधीक्षक दिवाणी न्यायालय,क.स्तर, बीड

हर घर जल
जल जीवन मिशन

# धारुर तालुक्यात जलजिवन च्या कामात अनियमितता, कामे रखडली

## गोरगरिबांच्या तोंडच पाणी पळवणाऱ्या ठेकेदारांवर कारवाई होणे अपेक्षित

**विश्वास शिनगारे**

धारुर तालुक्यातील जलजीवन योजनेच्या कामांसाठी शासनाने तब्बल १०० कोटी पेक्षा अधिक निधी मंजूर केला आहे; पण काही लोकप्रतिनिधी, ठेकेदार आणि अधिकार्यांच्या संगनमतातून यापैकी अनेक योजनांच्या कामांमध्ये गैरप्रकार चालू असल्याच्या तक्रारी वाढू लागल्या आहेत. त्यामुळे या योजनेच्या कामांची सखोल चौकशी होण्याची आवश्यकता आहे. केंद्र आणि राज्य शासनाच्या महत्त्वाकांक्षी जलजीवन मिशन योजनेंतर्गत तालुक्यासाठी तब्बल ६४ कामांना मंजुरी देण्यात आलेली आहे. स्वतंत्र पाणी पुरवठा योजनेसह पूर्वी असलेल्या योजनांच्या दुरुस्ती कामांचा यामध्ये समावेश आहे; मात्र या कामांमध्ये मोठ्या प्रमाणात अनियमितता आणि गैरकारभार सुरू असल्याच्या तक्रारी वाढत आहेत. स्थानिक नागरिकांना पूर्वकल्पना न देता काही ठरावीक कारभारीच ठेकेदारांना हाताशी धरून या योजना मनमानी पद्धतीने राबवून मंजूर निधीवर डल्ला मारत असल्याच्या तक्रारी आहेत तालुक्यातील नागरिकांना आता उन्हाच्या झळा बसू लागल्या आहेत. ग्रामीण भगातील पाणी स्त्रोत देखील बंद पडले आहेत कामे पूर्ण झाली असती तर नागरिकांना मुबलक पाणी उपलब्ध झाले असते पण कामाबाबत ठेकेदार उदासीन असल्याचे जाणवत आहे. ६४ योजनांपैकी ५ गावांमधील जलजीवन मिशनची कामे

**ग्रामीण पाणी पुरवठा अभियंता यांच्याशी संपर्क केला असता धारूर तालुक्यात जळजीवन योजने अंतर्गत ६४कामांना मंजुरी मिळाली आहे पैकी ५ कामे पूर्ण ५९ कामे प्रगतपथावर असल्याचे सांगितले. – वंदना साळवे अभियंता ग्रामीण पाणी पुरवठा विभाग**

पूर्ण झाली आहेत दोन वर्षांपासून काम सुरू असून आजअखेर एकूण योजनांपैकी केवळ पाच योजनांची कामे पूर्ण होण्याच्या मार्गावर आहेत, तर बाकीची कामे रडतखडत सुरू आहेत. शासनाने या महत्त्वाकांक्षी योजनेसाठी भरभरून निधी दिलेला आहे; पण या योजनेला अशा पद्धतीने गैरव्यवहाराचे ग्रहण लागत असेल, तर भविष्यातही जनता तहानलेलीच राहण्याचा धोका आहे. तालुक्यातील या योजनेच्या कामांचा ठेका काही मूठभर ठेकेदारांनाच मिळालेला दिसतो. ठेका मिळाल्यापासून अवघ्या काही दिवसांतच या ठेकेदारांच्या बुडाखाली आलेल्या आलिशान चारचाकी गाड्या बरेच काही सांगून जातात. हे ठेकेदार इतके मस्तवाल झाले आहेत की, स्थानिक नागरिकांनी कामांच्या दर्जाबाबत काही तक्रार केली की, लगेच गुरगुरायला लागतात, योजनेची नुसती चौकशी केली, तरी ही ठेकेदार मंडळी कोणताही थांगपत्ता लागू देत नाहीत. याचा अर्थ कुठेतरी बर्याच मोठ्या प्रमाणात पाणी मुरत आहे.

# लाखाचे मानकरी असलेल्या जनसेवक आमदार विजयसिंह पंडित यांना मंत्रीपदाची संधी द्या : शेखर भुंबे

**• गेवराईतील कार्यकर्त्यांच्या भावना**

**गेवराई । प्रतिनिधी**





गेवराई तालुक्यातील सर्व तरुण बांधवांनी व शिवछत्र परिवारांनी एकत्रित येत विजयपर्व हा पॅटर्नच्या माध्यमातून एक लाखाहून अधिक मताधिक्य घेत विजय झालेले गेवराई चे लाडके आमदार श्री. विजयसिंह शिवाजीराव पंडित यांना महाराष्ट्र राज्याच्या कॅबिनेट मंत्रीपदी संधी द्यावी अशी भावना शिवछत्र परिवारासह गेवराई तालुक्यातील असंख्य कार्यकर्ते व्यक्त करत आहे सोशल मीडियावर भावी मंत्री असा उल्लेख करत असल्याचे दिसून येते.

गेवराई तालुक्यातील बहुसंख्य कार्यकर्त्यांची भावना आहे की आमदार विजयसिंह पंडित नामदार व्हावेत. या मागचे कारण असे आहे की गेवराई विधानसभा मतदारसंघातून एक लाखापेक्षा अधिक मत घेऊन विजयसिंह पंडित हे विजयी झाले आहे. मतदारसंघातील सर्वपक्षीय नेते विजयसिंह पंडित यांचा पराभव करण्यासाठी एकत्रित आले असतानाही त्यांनी आपला विजय पर्वाचा रथ अखंडित ठेवला. मात्र सर्वसामान्य जनता ही अमरसिंह पंडित व विजयसिंह पंडित तसेच शिवछत्र परिवारांसोबत राहिलीय जनमताच्या कौलावर अगदी सोपी सहज निवडणूक करत विजयाचा झेंडा फडकवला. दस्तुरखुद्द उपमुख्यमंत्री अजित दादा पवार व प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी विजयाचे तोंड भरून कौतुक केले.असे अशा जनसेवक कर्तव्यदक्ष कार्य करणाऱ्या आमदाराला महाराष्ट्र राज्याच्या कॅबिनेट मंत्री म्हणून काम करण्याची संधी मिळाल्यास निश्चितच विकास कामाचा धडका लावतील असा विश्वास व्यक्त केला जात आहे निश्चितच महायुती सरकारला याचा फायदा होईल अशी अपेक्षा आमदार विजयसिंह पंडित यांच्यावर प्रेम करणारे असंख्य कार्यकर्ते व्यक्त करत आहेत म्हणून कॅबिनेट मंत्री पदाची जबाबदारी राजे साहेबांना द्यावी अशी मागणी युवा नेते शेखर भुंबे यांनी केले आहे

# संतश्रेष्ठ भगवानबाबांच्या कार्याचा आदर्श सर्वांनी घ्यावा: अंजलीताई केंद्रे महाराज यांचे आवाहन

**बीड । प्रतिनिधी**

संतश्रेष्ठ भगवानबाबांनी आध्यात्मासह समाजसुधारणेचे कार्य केले. त्यांच्या कार्याचा सुगंध सर्वत्र पसरला आहे. भगवानबाबाच्या कार्याचा आदर्श सर्वांनी घ्यावा, असे आवाहन स्वररत्न हभ.प. अंजलीताई केंद्रे महाराज यांनी केले. धन्य ते संसारी, या तुकाराम महाराज यांच्या अभंगावर, ह.भ.प. अंजलीताई महाराज बोलत होत्या.



मानवी जीवन जगताना, प्रत्येकाने आपले जीवन कृतार्थ करून घ्यावे, उद्धार करून घ्यावा. धन्यता करून घेतली, सहजतेने परमार्थ करून घेणारी माणसे देवतवाकडे पोहचतात. वारकरी संप्रदायाचे आदर्श ज्ञानेश्वर माऊली, निवृत्तीनाथ, सोपानकाका आणि मुक्ताई यांच्या जीवनातील चमत्कार आणि त्यांना झालेली त्रास दुःख हे विविध दृष्टांत देऊन देऊन भाविकांना मंत्रमुग्ध केले. साधू, संताचे जीवन अभिमान विरहित असते. संत समाजाच्या उदाहरणे कार्य करतात. आजच्या कौटुंबिक, सामाजिक परिस्थिती विषयी बोलताना कीर्तनकार ह भ प अंजलीताई केंद्रे यांनी कौटुंबिक जीवनात दया असावी. माणसे हैवान झाली आहेत. प्रेम, सदाचाराने जीवन जगले पाहिजे. आपल्या वाणीतून त्रास होउ नये. माणुसकी ठेवा, बाबा आणि भाऊ यांच्या 'वाऱ्या हाती माप' याप्रमाणे कीर्ती वाढली आहे. अधोगतीला की चागल्या मार्गाने जायचे ? हे ठरवा.

'नाही मनामध्ये भाव, देव मला पाव, अशाने देव पावयाचा नाही, देव बाजारचा भाजीपाला नाही देव असणे भेटायचं नाही' या भक्ती गीताद्वारे त्यांनी असो त्यांच्या हृदयाला हात घातला. जीवन धन्यतेच्या लायकीचे असावे साधना जीवनात असावी, व्यसनामुळे जीवनात ▶▶ उर्वरित पान २ वर

# लग्न सभारंभात फोटो ‘सेल्फीचा वाढतोय क्रेझ’

## स्टेटस डिपीला शेअर करण्यासाठी अती उत्साह

**किल्ले धारूर । प्रतिनिधी**

मोबाईलच्या जमान्यामध्ये आता सर्वत्र फोटो सेशन ची पद्धत वाढली असून सर्व ठिकाणी फोटोसेशन होताना दिसत आहे सध्या तर असे दिसून येत आहे की लग्न समारंभ कुंकू टिळा साखरपुडा गोड जेवण आधी कार्यक्रमात वधु वर सोबत फोटो काढून आपल्या स्टेटसला स्टोरीला फेसबुक डीपीला शेअर करण्यासाठी आणि सर्वजण उत्साहात दिसून येत आहेत तर ते ठेवलेले स्टेटस पाहून आपणही अशा प्रकारचे सेल्फी फोटो काढण्यासाठी पुढाकार घेऊन ज्या ठिकाणी लग्न समारंभ आहे त्या ठिकाणी पोचवून अगदी वधू वर पक्षाकडून वरबाब बंधू यांना भेट घेऊन त्यांच्यासोबत एक सेल्फी किंवा फोटो काढण्यासाठी सध्या नवतरुणामध्ये क्रेझ वाढली आहे.



पाठीमागील जमाने मध्ये पूर्वीच्या काळी फोटो म्हणजे एक दुर्मिळ गोष्ट होती की कॅमेऱ्याच्या साह्याने काढलेला फोटो नंतरची कॉपी धुवून आणण्याची त्याला वेळ पंधरा ते वीस दिवस लागायचे त्यानंतर तो फोटो ज्या त्या व्यक्तीला मिळायचा एखादया लग्न समारंभ असल्यास मोठा कॅमेरावाले जर कॅमेऱ्यामॅन लावले तर हळदी पासून ते शेवंती चडेपर्यंत अगदी मोजकेच फोटो काढायला लागत होते आणि त्या फोटोला काचा मध्ये मडून आणण्यासाठी मागणी असायची आणि तेच फोटो घरातील भिंतीवर अल्बम मध्ये

▶▶ उर्वरित पान २ वर

# सद्भावना पदयात्रेत प्रचंड मोठ्या संख्येने सहभागी व्हा

## अॅड. गणेश करांडे, अॅड. विद्याताई गायकवाड, शामसुंदर जाधव, डॉ. जयप्रकाश आघाव यांचे आव्हान

**बीड । प्रतिनिधी**



बीड जिल्ह्यामध्ये मागच्या दोन महिन्यापूर्वी सरपंच कै. संतोष देशमुख यांच्या हत्येनंतर जनसामान्यांमध्ये तयार झालेल्या भीतीच्या वातावरणाला सुधारण्यासाठी तसेच सामाजिक दोही सुधारण्यासाठी जी सद्भावना भारतीय राष्ट्रीय काँग्रेस च्या वतीने महाराष्ट्र काँग्रेस कमिटीचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन दादा सपकाळ यांच्या नेतृत्वात मसाजोग ते बीड आयोजित केली असून सर्वसामान्यांच्या मनातून जातीयता, गुंडगिरी, व सामाजिक असमानतेची भीती मुक्त करण्यासाठी व समाजात एकी राहण्यासाठी सदरील सदभावण्याची यात्रेचे नियोजन केले आहे या नियोजनात समाजातील, महिला, शेतकरी, युवक, व्यापारी, सामाजिक संस्थेचे पदाधिकारी, विविध समाजातील वरिष्ठ मंडळी तसेच न्यायप्रिय मंडळींनी तसेच संविधान प्रेमींनी सदरच्या सदभावना यात्रेत सहभागी व्हावे.

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन दादा सपकाळ, राज्यसभेवरील खासदार रजनीताई पाटील, भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे सचिव रविंद्रजी दळवी, जिल्हा काँग्रेस कमिटीचे जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे यांच्या नेतृत्वात संपन्न होणाऱ्या या यात्रेमध्ये अॅड. गणेश करांडे सरचिटणीस विधी विभाग ,अॅड. विद्याताई गायकवाड लातूर प्रभारी पंचायत राज विभाग, शामसुंदर जाधव जिल्हा उपाध्यक्ष युवक काँग्रेस , डॉ. जयप्रकाश आघाव प्रदेश समन्वयक आरोग्य विभाग यांनी सदभावना यात्रेत प्रचंड संख्येने सहभागी होण्याचे आवाहन केले आहे.



# सरकारी कामात अडथळा व बस चालकास मारहाण केल्या प्रकरणातील आरोपीची निर्दोष मुक्तता : अॅड.गणेश हनुमंत तावरे

**बीड । प्रतिनिधी**

मा. जिल्हा व सत्र न्यायाधीश साहेब बीड मा.आनंद ल.यावलकर साहेब यांनी दिनांक ५/३/२०२५ रोजी सत्र केस क्र.५६/२०२१ मध्ये शासकीय

▶▶ उर्वरित पान २ वर






# स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या अनुषंगाने शिवसेनेचा भगवा फडकविण्यासाठी शिवसैनिकांनी कामाला लागावे: परशुराम जाधव, परमेश्वर सातपुते

**बीड । प्रतिनिधी**

शिवसेना पक्षप्रमुख सन्माननीय उद्धवजी ठाकरे साहेब यांच्या आदेशाने व युवा सेना प्रमुख आदित्यजी ठाकरे साहेब, शिवसेना नेते तथा शिवसेना सचिव विनायकजी राऊत साहेब, शिवसेना मराठवाडा संपर्क नेते सुनील जी प्रभू साहेब,मराठवाडा समन्वयक विश्वनाथजी नेरूरकर साहेब, शिवसेनेचे सह संपर्क प्रमुख तथा माजी मंत्री बदामरावजी आबा पंडित, सहसंपर्कप्रमुख लक्षराजजी



सानप साहेब, सहसंपर्कप्रमुख बाळासाहेबजी अंबुरे साहेब, माजलगाव विधानसभा प्रमुख महादेवजी आंबेकर साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली व शिवसेना बीड जिल्हा संपर्कप्रमुख परशुरामजी जाधव साहेब अध्यक्षतेखाली व शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर यांच्या नेतृत्वाखाली आज वडवणी शहरातील जय मल्हार हॉटेल येथे माजलगाव विधानसभा मतदारसंघातील माजलगाव, वडवणी, धारूर तीन्ही तालुक्यातील शिवसेना पदाधिकाऱ्यांची आढावा बैठक मोठ्या उत्साहात संपन्न झाली.

यावेळी बोलताना जिल्हा संपर्कप्रमुख परशुरामजी जाधव साहेब व जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते म्हणाले की आपण सर्व उद्धवजी बाळासाहेब ठाकरे यांचे शिवसैनिक आहोत, त्यांच्या विचारांचे शिवसैनिक आहेत यामुळे आपापसात कोणतेही गट तट न मानता पक्षसंघटना वाढीसाठी काम करत रहा आपण केलेल्या कामाची दखल नक्कीच शिवसेना पक्षप्रमुख सन्माननीय उद्धवजी ठाकरे साहेब घेतील व येणाऱ्या , नगरपंचायत नगरपरिषद, जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकांमध्ये आपणास आपण केलेल्या कामाची पोचपावती देतील.

आता येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आहेत मोठ्या नेत्यांच्या खासदारकीच्या आमदारकीच्या निवडणुका संपल्या येणाऱ्या निवडणुका या तुमच्या आमच्या सर्वांच्या आहेत उद्याची जिल्हा परिषद निवडणूक पंचायत समिती निवडणूक, नगरपंचायत निवडणूक आहेत येथे आपल्यापैकीच कुणीतरी पंचायत समिती सदस्य झाला पाहिजे जिल्हा परिषद सदस्य झाला पाहिजे कुणीतरी नगर परिषद चा सदस्य झाला पाहिजे त्याच्यासाठी आमची ताकद तुमच्या पाठीमागे आहे म्हणून येथे जमलेल्या सर्व उपजिल्हाप्रमुखांना,तालुकाप्रमुखांना विनंती करतो कि आपल्या कार्यक्षेत्रातील जे रिक्त पदे असतील त्या साठी नावे देण्यात यावीत आम्ही दिलेल्या

▶▶ उर्वरित पान २ वर